



# पारनेर दर्शन





वर्ष १ अंक २४४, शुक्रवार १४ जुन २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# दिशा भोईटे मृत्यूप्रकरणी नातेवाईकांची चौकशीची मागणी

## वर्ष सरत आले तरी मृत्यूचा अहवाल हाती नाही



पारनेर : प्रतिनिधी

**वर्ष पूर्ण होत आले तरी घाणेगांव ( ता. पारनेर ) येथील दिशा राजू भोईटे (वय २१) या युवतीच्या मृत्यूचा अहवाल हाती आलेला नाही. मात्र सुपा पोलिस स्टेशनमधून जे सांगण्यात आले, त्यावर आम्हाला संशय आहे. यामुळे आम्ही पुन्हा एकदा पुर्नचौकशीची मागणी करत आहोत, असे दिशाच्या नातेवाईकांनी सांगितले.**

घाणेगांव ( ता. पारनेर ) येथील दिशा राजू भोईटे (वय २१) या युवतीचे २९ ऑगस्ट २०२३ म्हणजेच राखी पोर्णिमेच्या अगोदरच्या दिवशी निधन झाले. ससून रुग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले. त्यावेळी संशयास्पद मृत्यूमुळे व्हिसेरा राखून ठेवण्यात आल्याचे सांगण्यात आले. अहवाल कधी येईल? यासंबंधी ससूनमध्ये जाऊन अनेकदा नातेवाईकांनी माहिती घेण्याचा अनेकदा प्रयत्न केला. पण, माहिती तर मिळतच नव्हती.

ससून रुग्णालयात अनेकदा विचारणा केल्यानंतर सात महिन्यानंतर अहवाल सुपा पोलिस स्टेशनला पाठविण्यात आल्याचे सांगण्यात आले. सुपा पोलिस स्टेशनमधून आम्हाला अद्याप अहवाल हाती देण्यात आलेला नाही. पण, ब्लड इन्फेक्शनमुळे मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. आमच्या हाती अहवाल का देत नाहीत? याबाबत तर संशय आहेच. पण, ससून रुग्णालयातील कार्यभार पाहता आणि ब्लड सँपल बदलल्याचे समजल्यानंतर आम्हाला सुद्धा अहवालामध्ये संशय वाटत आहे. याबाबत पुर्नतपासणी करण्याची मागणी दिशाच्या नातेवाईकांनी केली आहे.

सर्वसामान्य नागरिकांना मृत्यूनंतर तरी न्याय मिळतो का. धनिकांच्या बाबतीत काहीही होऊ शकते. पण, सर्वसामान्यांचा कोणी वाली नाही, हे आता सिद्ध होत आहे, असे नातेवाईकांनी म्हटले आहे.

दरम्यान, एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाला तर संबंधित कुटुंब दुःखात बुडते. कुटुंबावर दुःखाचा मोठा डोंगर कोसळलेला असतो. संबंधित कुटुंबाला मृत्यूचे कारण समजत नाही. दुसरीकडे सरकारी काम. कोणी माहिती देत नाही. सर्वसामान्य नागरिकांना कोणाकडे जावे कळत नाही. यामुळे दिवस पुढे-पुढे जात राहतात. मग, आपली व्यक्ती गेली. आता मृत्यूचे कारण समजून काय होणार? हा विचार पुढे येऊ लागतो. पुढे संवेदनशील होऊ लागतो. पोलिस अथवा प्रशासनाकडे पाठपुरावा केला नाही तर मग विचारायलाच नको. मृत्यूमुखी पडलेल्या व्यक्तीला मृत्यूनंतरही न्याय मिळेल की नाही, हे कोणीच सांगू शकत नाही. यामुळे संबंधित कुटुंबियांनी सातत्याने पाठपुरावा करणे गरजेचे आहे. असे दिशांच्या नातेवाईकांनी सांगितले.

### भाची दिशा भोईटे हिच्या बाबत प्रथम घटनाक्रम

**दिशा हिला २४ ऑगस्ट २०२३ रोजी ताप आला.**

१) आनंद हॉस्पिटल, पारनेर (ता. पारनेर, जि. अहमदनगर):
२५ ते २८ ऑगस्ट दरम्यान पारनेर येथील आनंद हॉस्पिटलमध्ये उपचारासाठी दाखल.
२८ ऑगस्ट रोजी आनंद हॉस्पिटल, पारनेर (ता. पारनेर, जि. अहमदनगर) येथून डिस्चार्ज.
२८ ऑगस्ट रोजी मध्यरात्री दिशाला प्रचंड त्रास होऊ लागला.
२) ओंकार रुग्णालय (सुपा) (जि. अहमदनगर):
२९ ऑगस्ट रोजी सकाळी ओंकार रुग्णालय (सुपा) येथील रुग्णालयात दाखल.

- ओंकार रुग्णालयाने रक्त तपासणी केली
- रक्ताचा अहवाल हाती आल्यानंतर डेंगू झाल्याचे निदान.
- ओंकार रुग्णालयाच्या डॉक्टरांनी पुण्याला घेऊन जाण्याचा सल्ला दिला.
- दिशा हिची प्रकृती ढासळत चालली होती.
- ओंकार रुग्णालयातील डॉक्टरांची अरेरावीची भाषा
- रुग्णालयाकडे रुग्णवाहिकची व्यवस्था नव्हती.
- नातेवाईकांना तुमची रुग्णवाहिका नको म्हणून सांगण्यात आले
- हॉस्पिटलची रुग्णवाहिका फोन केल्यानंतर तब्बल दीड तासानंतर आली.
- एरवी अर्धा तासात रुग्णालयात रुग्णवाहिका पोहचते.
- रुग्णवाहिकेत रुग्णासोबत एक डॉक्टर आणि नातेवाईक
- रुग्णवाहिका पुणे शहराच्या दिशेने निघाली.
- दिशा शिरूर जवळ असताना पोट दुखत असल्याचे सांगू लागली.
- रुग्णवाहिकेमधील डॉक्टरने एक इंजेक्शन दिले.
- डॉक्टरने इंजेक्शन दिल्यानंतर दिशा दहा मिनिटानंतर बोलायची बंद झाली ती कायमचीच.
- रुग्णवाहिका केईएम रुग्णालयात संध्याकाळी सहाच्या सुमारास दाखल झाली.
- केईएमच्या रुग्णालयातील डॉक्टरांनी दिशाचा मृत्यू झाल्याचे सांगितले.
- दिशाचा मृतदेह ससून रुग्णालयात शवविच्छेदनासाठी.
- २९ ऑगस्ट रोजी रात्री शवविच्छेदन करण्यात आले.
- मृत्यूबाबत संशय व्यक्त करत व्हिसेरा राखून ठेवण्यात आला आहे.
- ३० ऑगस्ट रोजी दिशावर अंत्यसंस्कार.

# मनोज जरांगे यांचे उपोषण स्थगित

## ■ सरकारचे शिष्टमंडळ भेटल्यानंतर घोषणा
## ■ अंमलबजावणीसाठी १३ जुलैची मुदत



जालना : प्रतिनिधी

**मराठा आरक्षणातील सगेसोयऱ्यांच्या अंमलबजावणीच्या मुद्द्यावर राज्य सरकारने मनोज जरांगे यांच्याकडे आता एक महिन्याचा वेळ मागितला आहे. त्यासाठी राज्य सरकारकडून मंत्री शंभूराज देसाई, राणा जगजितसिंह आणि खासदार संदिपान भुमरे यांनी जरांगेंची भेट घेतली. तर ३० जूनच्या आत सर्व गोष्टी रितसर करून घ्या अशा सूचना मनोज जरांगे यांनी सांगितले आहे. मनोज जरांगे यांच्या उपोषणाचा आज सहावा दिवस असून त्यांच्या भेटीसाठी राज्याचे शिष्टमंडळ अंतरवाली सराटीमध्ये आले आहे. या शिष्टमंडळाच्या विनंतीनंतर आता मनोज जरांगे यांनी आमरण उपोषण स्थगित केले आहे.**

लोकसभेच्या निवडणुका झाल्यानंतर पुन्हा एकदा अंतरावाली सराटी हे राज्याचा केंद्रबिंदू बनले आहे . गेल्या सहा दिवसांपासून मनोज जरांगे यांचे उपोषण सुरू आहे. सगेसोयऱ्यांच्या बाबीची अंमलबजावणी करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. तर मराठा आंदोलनाच्या काळातील सर्व गुन्हे मागे घ्यावेत अशीही मागणी त्यांनी केली. पण गंभीर गुन्हे मागे घेता येणार नाहीत असे राज्याचे मंत्री शंभूराज देसाईनी त्यांना समजावले. तसेच येत्या ३० जूनपर्यंत सर्व गोष्टी या रितसर कराव्यात असे जरांगे म्हणाले. त्यावर मनोज जरांगे यांनी तब्येतीची काळजी घ्यावी आणि मराठा आरक्षणावर निर्णय घ्यायला एक महिना वेळ द्यावा अशी विनवणी यावेळी शंभुराज देसाई यांनी केली.

सगेसोयऱ्यांची अंमलबजावणीसंबंधी सरकारची मानसिकता नाही हे जरांगेंनी डोक्यातून काढून टाकावे, शिंदे साहेबांनी त्याचा शब्द दिला आहे असं शंभुराज देसाई यांनी सांगितले. हा प्रश्न कायद्याच्या चौकटीत सोडू, त्याला इतरांचा विरोध व्हायला नको. यावर येणाऱ्या हरकती या मंत्रिमंडळाच्या बैठकीसमोर ठेवल्या जातील.सगळे सोयऱ्यांच्या बाबतीतली ही टेक्निकल प्रोसेस लवकर करू. अधिकाऱ्यांना बोलावतो, किती हरकती आल्या किती छाननी केल्या, किती राहिल्या याचा टाईम बॉण्ड अहवाल जाहीर करू. तुम्ही तब्येतीकडे लक्ष द्या मित्र म्हणून माझा ऐका. तुमचे प्रतिनिधी पाठवा, त्यांचे नाव सांगा, आपण बैठक मुख्यमंत्र्यांकडे लावू.

# सुनेत्रा पवार यांचा राज्यसभेसाठी अर्ज

## राष्ट्रवादीच्या नाराजी नाट्यावर पडदा

मुंबई : प्रतिनिधी

**बारामती लोकसभा मतदारसंघातून पराभूत झालेल्या सुनेत्रा पवार यांनी आता राज्यसभेसाठी अर्ज भरला आहे. राज्यसभेच्या १० जागांसाठी निवडणुका होणार आहेत. त्यासाठी त्यांनी आज विधानभवनात दाखल होत उमेदवारी अर्ज भरला. यावेळी अजित पवार गटाचे अनेक नेते उपस्थित होते.**



२०२४ ची लोकसभा निवडणूक नुकतीच पार पडली. एनडीएने तिसर्यांदा सरकार स्थापन केले. आता राज्यसभेचे १० खासदार लोकसभेवर निवडून गेल्यामुळे राज्यसभेच्या (आरएस) सचिवालयाने सात राज्यांतील १० जागांवर लवकरच निवडणुका होणार असल्याचे अधिसूचित केले आहे. निवडणूक आयोगाने या १० जागांसाठी होणार्या निवडणुकीच्या तारखा अद्याप घोषित केलेल्या नाहीत.

या १० जागांपैकी सात जागाभाजपा,दोनकाँग्रेसआणि एक जागा राष्ट्रीय जनता दल (आरजेडी) कडे होती. काँग्रेस आणि आरजेडी हे दोन्ही इंडिया आघाडीतील प्रमुख पक्ष आहेत. कनिष्ठ सभागृहात निवडून आलेल्या भाजपाच्या राज्यसभा खासदारांमध्ये सर्बानंद सोनोवाल (आसाम), ज्योतिरादित्य शिंदे (मध्य प्रदेश) आणि पीयूष गोयल (महाराष्ट्र) यांचा समावेश आहे. तर, प्रफुल्ल पटेलांचीही एक जागा रिकामी होती. त्यामुळे या जागेवर कोणाला संधी देणार याकडे सर्वांचं लक्ष लागलं होतं.

या जागेसाठी छगन भुजबळ आणि सुनेत्रा पवारांच्या नावाची चर्चा होती. आज याबाबत बैठक घेऊन सुनेत्रा पवारांच्या नावावर शिक्कामोर्तब झाल्याची माहिती छगन भुजबळ यांनी दिली. ते म्हणाले, ''मंत्रिमंडळातील

उर्वरीत पान ३ वर

# औटी बंधूंसह दोघांची न्यायालयीन कोठडीत रवानगी

## अॅड. राहुल झावरेंवरील जीवघेणा हल्ला प्रकरण

पारनेर : प्रतिनिधी

**माजी नगराध्यक्ष विजय औटी, मा. नगरसेवक नंदू औटी तसेच प्रितेश पानमंद व मंगेश कावरे यांची पारनेरच्या न्यायालयाने गुरूवारी न्यायालयीन कोठडीत रवानगी केली. खा. नीलेश लंके यांचे सहकारी अॅड. राहुल झावरे यांच्यावर विजय औटी व त्याच्या सहका-यांनी गेल्या गुरूवारी जीवघेणा हल्ला केला होता. या हल्ल्याप्रकरणी औटीसह इतर तिघांना गुरूवारीच पोलीसांनी अटक केली होती.**



अॅड. राहुल झावरे यांच्यावरील हल्ल्यानंतर आरोपींना अटक करण्यात आल्यानंतर त्यांना गेल्या शुक्रवारी त्यांना पारनेरच्या न्यायालयापुढे उभे करण्यात आले असता न्यायालयाने त्यांना पाच दिवसांची पोलीस कोठडी दिली होती. कोठडीची मुदत गेल्या मंगळवारी संपल्यानंतर आरोपींना पुन्हा न्यायालयापुढे उभे करण्यात आले असता न्यायालयाने त्यांच्या पोलीस कोठडीत दोन दिवसांची वाढ केली होती. दोन दिवसांच्या कोठडीची मुदत गुरूवारी संपल्यानंतर त्यांना न्यायालयापुढे उभे करण्यात आले असता न्यायालयाने त्यांची न्यायालयीन कोठडीत रवाणगी केल्याचे पोलीस निरीक्षक समीर बारवकर यांनी सांगितले.

# बारामतीत दबावाचे वातावरण होते!

## ■ शरद पवारांचा अजित पवारांवर निशाणा
## ■ विधानसभा ताब्यात घेण्याचा व्यक्त केला विश्वास

बारामती : प्रतिनिधी



**महाराष्ट्रातील ४८ जागांपैकी लोकसभा निवडणुकीत आघाडीने ३० जागा निवडून आल्या आहे. आम्ही जाणीवपूर्वक कमी जागा घेऊन दहा पैकी आठ जागा राज्यातील जनतेने निवडून दिल्या आहे. निवडणुकीत आम्ही पुढाकार घेतला आणि सर्वांना एकत्रित केले. जनतेने त्यास चांगल्याप्रकारे प्रतिसाद दिला. असल्याचे शरद पवार यांनी म्हटले आहे.**

बारामतीची निवडणुक यंदा देशात गाजली, दिल्ली, केरळ, हैद्राबाद येथे गेलो तर त्याठिकाणी बारामतीची निवडणुक वृत्तपत्रात गाजत होती. निवडणुकीत सर्वजण काम करत होते परंतु काही गावात लोकांवर दडपण जाणवत होते. काही लोक प्रचारास सुरुवातीला आले पण नंतर गायब झाले. अनेकांची नावे घेता येतील. माझ्यासोबत अनेकजण असतात परंतु ते निवडणुकीत दिसले नाही. एकप्रकारे दबावाचे वातावरण निवडणुकीत होते असे मत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष खासदार शरद पवार यांनी शुक्रवारी व्यक्त केले.

शुक्रवारी शरद पवार यांनी बारामती परिसरातील सुपे, उंडेवाडी भागात दुष्काळ दौरा केला त्यावेळी ते बोलत होते. पवार म्हणाले, या देशात राजकीय लोकांपेक्षा लोकशाही बद्दल आस्था सामन्य जनतेस अधिक आहे. जनता कधी आपले मत दाखवत नाही परंतु ते करुन दाखवतात. लोकसभा निवडणुकीत सुप्रिया सुळे यांना ज्याप्रकारे मतदान झाले त्यातून जनतेच्या मनात काय हे दाखवून दिले. दीड लाख मतांनी सुळे जिंकून आल्या.

मला अनेक निवेदने दुष्काळ दौऱ्या दरम्यान येत असून बहुतांश लोकांची मागणी पुरेसे पाणी मिळावे यासाठी आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांना परदेशात कांदा निर्यात करण्यासाठी ४० रुपये कर लावण्यात आला. दुसऱ्या राज्यातील शेतकऱ्यांचे कांदा निर्यातीवर कर नाही परंतु महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना कर आहे. हे परिस्थिती

उर्वरीत पान ३ वर

# सुपर ८ मध्ये भारत ऑस्ट्रेलिया आमने सामने

## टी-२० विश्वचषक स्पर्धा



मुंबई : वृत्तसंस्था

**टी-२० विश्वचषक २०२४ च्या सुपर८ फेरीसाठी आतापर्यंत ४ संघ निश्चित झाले आहेत. दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, भारत आणि वेस्ट इंडिज या संघांनी सलग तीन सामने जिंकत सुपर८ फेरीत धडक मारली आहे. भारतीय संघ अ गटातून, आफ्रिका संघ ड गटातून पात्र ठरला आहे, ऑस्ट्रेलियन संघ ब गटातून तर वेस्ट इंडिजच्या संघाने क गटातून आपले स्थान निश्चित करण्यात यशस्वी झाला आहे. त्याचवेळी, सुपर८ मध्ये भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामना देखील निश्चित झाला आहे. ज्याबद्दल आयसीसीने देखील वेळापत्रकात माहिती दिली आहे.**

भारतीय संघाला अजूनही अ गटातील शेवटचा सामना खेळायचा आहे ज्यात त्यांचा सामना कॅनडाच्या संघाशी होईल जो १५ जून रोजी फ्लोरिडाच्या मैदानावर खेळला जाईल. यानंतर टीम इंडिया आपले पुढील सर्व सामने वेस्ट इंडिजमध्ये खेळण्यासाठी रवाना होईल. सुपर ८ फेरीत भारत एकूण तीन सामने खेळणार आहे. भारताचे हे तीन

उर्वरीत पान ३ वर






फॅशन | संसार | सौंदर्य

# सखी



# असली स्टाईल नको रे बाबा...

**प्रत्येक मुलीचं स्वतःचं असं स्टाइल स्टेटमेंट ठरलेलं असतं. चारचौघांत वेगळं दिसण्यासाठी म्हणून तिचे प्रयत्न असतात. काहीवेळा मात्र तुमची हीच स्टाइल आरोग्याला घातक ठरू शकते. ती जीवावर बेतण्याआधीच योग्य ती काळजी घेतली पाहिजे.**

- मोठ्या बॅग्ज : नाकापेक्षा मोती जड! सध्या आकारानं मोठ्या असणाऱ्या बॅग्जची चलती आहे. ही बॅग हलकी असते, तोपर्यंत काही चिंता नाही; पण बॅगमध्ये जागा आहे या विचारानं मुली त्यात भारंभार सामान भरत जातात. नकळतपणे त्याचं ओझं एका खांद्यावर पडतं आणि तो दुखवायला सुरुवात होते. काही मुलींना तर बॅग खांद्याला अडकवून गाडी चालवण्याची सवय असते. त्यावेळी हाताची हालचाल मर्यादित होत असल्यानं ज्या खांद्यावर बॅग आहे, तो आखडला जातो. मानेचे स्नायूही दुखावतात. ते आखडणं ही मोठ्या दुखण्याची सुरुवात असू शकते हे लक्षात घ्या. त्यामुळे मोठी बॅग घेतली, तरी ती कॅरी करताना खांदा बदला. कधी ती नुसती हातात घेऊन चाला. गाडी चालवताना, तर ती खांद्यावर नकोच.
- किलर हिल्स : हिल्स म्हणजे प्रत्येक मुलीचा जीव की प्राणच. हिल्समुळे चालण्यात ग्रेस येत असली, तरी ते कायम वापरणं तोट्याचं आहे. हिल्स घातल्यानंतर पोश्चर ताठ राहातंच असं नाही. ते ठेवणं हीसुद्धा एकप्रकारची कला आहे. हिल्स घालून चालताना खांद्यात, पाठीत, कंबरेत आणि गुडघ्यात वाकायला होतं. यामुळे तिथले स्नायू दुखवण्याची शक्यता असते. तसंच, चालताना पाय वाकडा पडत असेल, तर तिथल्या टिश्यूंनाही हानी पोहोचते. त्यामुळे झेपतील आणि पोश्चर ताठ राहील अशाच हिल्सला प्राधान्य दिलेलं बरं. सतत हिल्स वापरून पायाच्या शिरा दुखावून कालांतरानं व्हेरिकोज व्हेन्सचा आजारही होऊ शकतो.
- टाइट जीन्सची फाइट! : बॉडी फिटिंग जीन्स तर मुली सर्रास वापरतात. डॉक्टरांच्या म्हणण्यानुसार, यामुळे पायाची नस दबली जाऊ शकते. मांडीजवळची नस दबली जाण्याची शक्यता अधिक असते. तसंच, ज्यांना जास्त घाम येतो, त्यांनी अशा जीन्स घालता कामा नये. त्यामुळे फंगल किंवा स्वेटिंग इन्फेक्शन होण्याची भीती असते.
- पोनी टेल्स : जीन्स किंवा वेस्टर्न्सवर टाइट पोनी टेल चांगला दिसतो म्हणून तो सातत्यानं घालणं टाळा. यामुळे कपाळ मोठं होऊ शकतं, केसांची मुळं दुखावली जातात, डोकेदुखी सुरू होते, विशेषतः जिथं पोनी बांधला आहे, तिथल्या जागेला इजा पोहोचू शकते.
- अंतर्वस्त्रांची निवड : इनर गारमेंट्सची योग्य ती निवड आपल्यासाठी खूप महत्त्वाची आहे. ओढूनताणून डिझायनर, ट्रेंडी, कलर्ड ब्रा किंवा पँटी घालण्याच्या फॅशनमध्ये आपण आपलं नुकसान तर करून घेत नाही ना, ते पाहा. ब्रा कितीही स्टाइलिश असली, तरी योग्य त्या फिटिंगची नसेल किंवा कव्हं पूर्ण करणारी नसेल, तर स्तनाचे टिश्यू सैल पडू शकतात. तसंच, ती अती घट्टही नको. यामुळे टिश्यू ताणले जाण्याची शक्यता असते. काही संशोधनामध्ये तर घट्ट ब्रामुळे पाठीचं दुखणं आणि रक्ताभिसरणाला अडथळे निर्माण झाल्याची उदाहरणं समोर आली आहेत. इतर अंतर्वस्त्रांबाबतही हेच लागू होतं.

# स्टाईल जर्किन्सची!

**पावसाळा आला की निसर्ग, मुक्तविहार, रोमँटिक वातावरण या सगळ्याबरोबरच अत्यंत प्रॅक्टिकल विचार डोक्यात येतो, तो कपडे, ॲक्सेसरीजविषयीचा. म्हणजे पावसात हे सगळं नीट सांभाळायचं कसं, याचीच काळजी वाटायला लागते; पण पावसाळी कपड्यांतही अपडेट राहायचं असेल, तर जर्किन्सच्या काही नव्या स्टाइलविषयी माहिती घ्यायलाच हवी.**

- व्यक्तिमत्त्वाचा विचार : अनेकदा रेनकोट आणि जर्किनच्या पॅटर्नमध्ये फार वैविध्य पाहायला मिळत नाही. सध्या बाजारात उपलब्ध असलेल्या ट्रेंडपैकी काही जर्किन्स आवर्जून आपल्याला हव्या त्या लूकची आणि आरामशीरपणा देणारी आहेत. जर्किन असलं, तरी त्याची फॅशन आपल्याला शोभेल, की नाही हा विचार केला जातोच. त्यामुळे आपल्या व्यक्तिमत्त्वाचा नेमका विचार करून जर्किनच्या बाबतीत आपल्याला अपडेट राहता येईल.
- चेक्स आणि बिनबाह्या : बिनबाह्यांची जर्किन्स फॉर्मल शर्टवर खुलून दिसतात. त्यांच्या आकार, रंग आणि पॅटर्नमध्येही सध्या बरंच वैविध्य पाहायला मिळतंय. प्लेनबरोबरच चेक्सची ही जर्किन फॅशन स्टेटमेंट म्हणून जीन्स, सिक्स पॉकेट्स किंवा हिप- हॉप पँट्सवर उत्तम दिसतात. आतल्या बाजूनं ही जर्किन्स मऊ कापडाची असल्यामुळे त्यातून ऊबही चांगली मिळते. यात काळा, निळा, पिवळा-हिरव्याची रंगसंगती असलेली जर्किन्स मस्त दिसतात.
- विरुद्ध रंगसंगती : बिनबाह्यांच्या किंवा पूर्ण बाह्यांच्या चेक्सच्या जर्किनमध्ये अनेकदा संपूर्ण जर्किनचा रंग आणि त्यांच्या खिशांचा रंग वेगळा असतो. ही परस्परविरोधी रंगसंगती उत्तम दिसते. काही कपडे हे कधीही घालता येणारे, पुन्हा पुन्हा वापरावेसे वाटणारे किंवा कपाटात हात घातल्यावर आपणहूनच आपल्याला खुणावणारे असतात. त्यातलाच एखादा आपला लाडका टी- शर्ट असेल, जो सद्यःस्थितीत खराब झाला आहे किंवा फार चांगल्या अवस्थेत नाही. अशा वेळी त्या टी-शर्टवर हे नवं कोरं जर्किन घालता येऊ शकतं. लाडका टी-शर्ट घालण्याची इच्छाही पूर्ण होते आणि विरोधी रंगसंगती असल्यामुळे ते खुलूनही दिसतं.



- स्पोर्टी लूक : संपूर्ण काळ्या रंगाचं जर्किन आणि त्याच्या बाह्या पांढऱ्या (विरुद्ध) रंगाच्या... अशी जर्किनही उत्तम स्पोर्टी लूक देतात. त्यात फिका केशरी, पिवळा, जांभळा, कॉफी कलर, गडद चॉकलेटी, हिरवा, निळा, आकाशी, करडा असे रंगही सुंदर दिसतात. बऱ्याचदा हूड असलेल्या जर्किनला तरुणांकडून पसंती दिली जाते. ऑफिस किंवा कॉलेजच्या रोजच्या वापरासाठी पट्टे असलेली जर्किनही तरुणांमध्ये लोकप्रिय आहेत.
- पोलो नेक : पोलो नेक जर्किनही त्यांच्या वेगळ्या पॅटर्नमुळे तरुणांच्या पसंतीची ठरतात. झिप गळ्यापर्यंत असल्यामुळे यातून पाणी आत शिरण्याचाही प्रश्न येत नाही. पाऊस नसेल, त्या दिवशी ही झिप फक्त गळ्यापर्यंतच लावून ओपन कॉलर म्हणूनही याचा उत्तम उपयोग होऊ शकतो.

# मान्सून... खरेदीचा मोसम!

**पावसाची खरेदी करून झाली असेल, तर किरकोळ शॉपिंगसाठी तयार व्हा. बाजारात कानातले, गळ्यातले, हेअर क्लिप, हेअरबँड, इमिटेट ज्वेलरी यामध्ये तुफान चलती आहे. सध्या पावसाच्या खरेदीचा जोर आहे. रेनकोट, छत्र्या, बॅग, चप्पल, शूज अशा खरेदीसाठी लोक कोरोनाच्या सावटातही दिसत असले तरी या व्यतिरिक्तही वस्तू खरेदीकडे कल आहे. तसं म्हटलं तर कपडे, बॅग, शूज, चप्पला यामध्ये फारसं नावीन्य नाही; पण विंडो शॉपिंगसाठी बराच वाव आहे. कानातले, गळ्यातले, क्लिप, हेअरबँड, इमिटेट ज्वेलरी अशा ॲक्सेसरीजमध्ये तुफान नावीन्य दिसून येतंय. यामध्ये डिझाइन आणि रंगांमध्ये व्हरायटी असल्यानं खरेदीला खूप वाव आहे. मोठ्या पर्स नाही; पण हँडबॅगची खरेदीही नक्कीच आनंद देणारी ठरेल. नटण्या-मुरडण्यासाठी सध्या कोणता सण किंवा मुहूर्त नाही खरा. तरीही व्हरायटीचं कलेक्शन करायला हरकत नाही.**



- मेरा कमरपट्टा! : छल्ल्याच्या डिझाइनमध्ये मोडणारा कमरपट्ट्याचा प्रकार तरुणींमध्ये इन आहे. बाजूला कुंदन आणि स्टोनचं वर्क असलेले दोन छल्ले आणि त्यांना जोडणारी मोत्याची सुरेख माळ असं त्याचं स्वरूप आहे. सोन्याचे कमरपट्टे किंवा छल्ले हे वर्कच्या आणि डिझायनर साड्यांवर चालत नाही; पण या आधुनिक प्रकारानं ती कमतरता दूर केली आहे.
- हँडबॅग माझी खास : स्टाइलिश हँडबॅग घेण्याच्या विचारात असाल, तर हीच योग्य वेळ आहे. म ल्टिकलर्ड क्लच किंवा क्रॉस बॅगची खरेदी तुमची शोधाशोध नक्कीच संपवेल. आता पाऊस आहे म्हटल्यावर अशा बॅग बाहेर काढता येत नाहीत. मात्र, त्याची तरतूदही बाजारात आहे! रबर प्लास्टिक प्रकारामध्ये क्रॉस बॅग आणि मोबाइल पाउच उपलब्ध आहेत. हा प्रकार सगळ्यांत खास म्हणावा असा आहे.
- आराध्या बेल्ट! : ऐश्वर्या रॉय- बच्चननं मुलगी आराध्याला केसांना डिझायनर बेल्ट लावणं सुरू केल्यानंतर बाजारात असेच बेल्ट ढिगानं आले. हा ट्रेंड अद्याप टिकून आहे. सिंगल बेल्ट आणि त्यावर विविधरंगी मोठं फुल असं त्याचं स्वरूप. आराध्याचं हे स्टाइल स्टेंटमेंट रस्त्यावरही लगेचच उतरलंय! सगळ्या आयांच्या नजरा त्याच्याकडेच खेचल्या गेल्यात.
- स्टाइलिश हेअरपिन्स : केस न विंचरता कसेही बांधण्याची किंवा मोकळे सोडण्याची फॅशन कॉलेज तरुणींमध्ये आहे. हे केस आवरण्यासाठी म्हणून मोठ्या पिना वापरता येतील. विविधरंगी हेअरपिन्सची चलती असल्यानं रखरखीत केसही स्टाइलिश दिसतील!
- टाकाऊपासून टिकाऊ! : लाकडी कानातल्यांचं डिझाइन तरुणींचं लक्ष वेधून घेतंय. विविध भौमितिक आकारांमध्ये याचे सेट उपलब्ध आहेत. जीन्स किंवा स्कर्टवर ट्रेंडी गळ्यातल्याच्या शोधात असाल, तर हेच खरेदी करा. लांबीनं मोठं असल्यानं ते पाश्चात्य पेहरावावर शोभून दिसतं. मेटलमध्ये लांबीनं मोठे गळ्यातले मिळून जातील. मात्र, त्यासाठी जास्त पैसे मोजण्याची तयारी हवी.


## कान में झुमका...

सध्या मोठ्या कानातल्यांची फॅशन आहे. डिझायनर साडीवर नुसते हे कानातले घातले, की बातच होऊन जाते. आधी काही डिझायनर शो-रूममध्येच असे कानातले मिळायचे. आता यामध्ये बरीच व्हरायटी रस्त्यावरच्या दुकानांमध्ये आली आहे. आधुनिक आणि पारंपरिक प्रकार यामध्ये पाहायला मिळतात. झेडएक्स या सिंगल स्टोनचा आधुनिक प्रकार खूपच खास आहे. यात कानातले आणि गळ्यातल्याचा सेट मिळून जाईल. गळ्यातलं नको असेल, तर नुसता कान पॅटर्न घेऊ शकता. यामध्ये अख्खा कान कव्हर करणारं डिझाइन आहे. कुंदन, मोती आणि क्रिस्टल बॉलमध्ये हा प्रकार उपलब्ध आहे. पारंपरिक झुमके नको असतील तर मेटलमध्ये मोठ्या कानांतल्यांची बरीच व्हरायची पाहायला मिळतेय. कानाच्या पाळीला लहान गोल आणि त्याखाली मोठा गोल अशाप्रकारचं त्याचं डिझाइन आहे.



# फॅशन मधल्या भांगाची!

बी-टाऊनमध्ये एखादी फॅशन यायची देर की कॉलेजच्या मुलींनी ती आपलीशी केलीच म्हणून समजा. सध्या फॅशन आहे, ती मिडल पार्टीशन म्हणजे, केसांत मधोमध भांग पाडण्याची. मधोमध भांग पाडून घट्ट वेणी घालणं ही आपली पारंपरिक फॅशन. म्हणूनच की काय आत्ताआत्तापर्यंत मुली त्याला नाकं मुरडताना दिसायच्या. फॅशनेबल दिसायचं म्हणजे, मधल्या भांगाऐवजी डाव्या किंवा उजव्या बाजूला भांग पाडलाच पाहिजे असा एक फंडा होता. पण सध्या मात्र तो बदलताना दिसतोय. अनुष्का शर्मा, आदिती राव-हैदरी, सोनम कपूर यांचा रेड कार्पेट लुक पाहिला तर मधल्या भांगाची फॅशन अगदी ठळकपणे दिसून येईल. सध्या कॉलेजच्या लेडिज रुममध्ये बऱ्याचजणी आरशात पाहून आपला हा मधला भांग पाडण्यात मग्न असतील तर नवल वाटायला नको!



# नातं दिराशी...

**दिरासोबतचं एक नातं जपताना थोडीशी चूक किंवा निष्काळजीपणा केल्यास एक नाही तर अनेक नाती खराब होतात. त्यामुळे दिरासोबत नातं कसं ठेवावं, याबाबत प्रत्येक विवाहितेने काही गोष्टींचा विचार करायला हवा.**

वहिनी आणि दिराच्या नात्यात काही मर्यादा आवश्यक असतात. दिरासोबत बोलताना काही गोष्टींचे भान हवे. यामुळे नात्यात एकमेकांविषयी आपोआप आदर येतो. यामुळे नात्यात अशी कोणती घटना किंवा प्रसंग घडत नाही. ज्यामुळे आयुष्यात दोघांनाही तणावातून जावं लागेल. नातं कितीही मैत्रीपूर्ण असो पण याचा अर्थ असा मुळीच नसतो की दोघांना एक मेकांच्या वैयक्तिक आयुष्यात हस्तक्षेप करण्याचे अधिकार मिळालेत. समोरची व्यक्ती आपला सल्ला मागत नाही तोपर्यंत आपण स्वत:हून हस्तक्षेप करणं चुकीचं असतं. तुमच्या वैवाहीक आयुष्यातही दिराला सामील करू नका. कारण यामुळे गैरसमज वाढू शकतात. कारण अनेक महिला नवरा आपल्यासोबत काही वाईट वागला की दिराला सांगून नवऱ्याला समजावून सांगण्याची गळ घालतात. हे पूर्ण चुकीचे आहे. यामुळे आपलेच नाते खराब होते, हे त्यांच्या लक्षात येत नाही. नवरा आणि दिराच्या संभाषणातही यायला नको. दोघांच्या भांडणांमध्येही पडू नका. बऱ्याचदा मैत्रीत गुपितं असतात पण वहिनी आणि दिराच्या नात्यात गुपितं ठेवणं भारी पडू शकतं. दिराने कोणते गुपित नवऱ्यापासून लपवण्यास सांगितले तर असं मुळीच करू नका. हे लपवा-छपवी करण्यापासून दिराला सरळ नकार द्या. दिराशी संबंधित कोणतीच गोष्ट निदान नवऱ्यापासून तरी लपवू नका. दिर तुम च्याकडे पैसे मागतो आहे तर अशावेळी व्यावहारीक दृष्टीकोन बाळगा. एकदा तुम्ही पैसे दिल्यास तो सतत तुमच्याकडे येऊ शकतो आणि दरवेळी नवऱ्यापासून लपवून पैसे देणं तुम्हाला महागात पडू शकतं.



# मास्कमुळे सौंदर्याला बाधा... ही घ्या काळजी

मास्कच्या वापरामुळे अनेक जणींना चेहऱ्यावर मुरुम, बारीक पुरळ आणि रॅशेजचा त्रास होत असल्याचे दिसून येत आहे. मास्क घट्ट बांधल्यानं श्वास घेतानाही अडचणी निर्माण होत आहेत. त्यामुळे मास्क वापरताना कळत नकळत चुका करू नका. तुमच्याच चुकांमुळे चेहऱ्याचं नुकसान होऊ शकतं. घाम, चेहऱ्यावरील अतिरिक्त तेल(तेलकट त्वचा), धूळ, मातीचे कण चेहऱ्यावर लावलेल्या मास्कवर जमा होतात. वातावरणातील दुर्गंधीचा चेहऱ्यावर वाईट परिणाम होतो. यामुळे त्वचेवर मुरुम, बारीक पुरळ, त्वचेला खाज सुटणे, त्वचा लाल होणे, मुरुमांचे डाग आदी समस्या उद्‌भवतात. सोबतच रक्त वाहिन्यांवरही यामुळे वाईट परिणाम होऊ लागतो. या समस्येपासून सुटका मिळवण्यासाठी आपल्या त्वचेची नियमित देखभाल करणं आवश्यक आहे. तुम्ही चेहऱ्यासाठी वापरत असलेले मास्क स्वच्छ आहे की नाही? याची खात्री करून घेणे आवश्यक आहे.

## मेकअप नकोच

**कित्येक महिलांना विनाकारण मेक अप करण्याची सवय असते. पण मास्क लावलेले असताना चेहऱ्यावर मेक अप करणं टाळा. चेहऱ्यावर मेक अप लावल्यानं त्वचेला पुरेशा प्रमाणात ऑक्सिजनचा पुरवठा होत नाही. यामुळे रक्ताभिसरण प्रक्रियेवरही परिणाम होतो. यामुळे त्वचेवरील छिद्रांमध्ये दुर्गंध जमा होऊ लागते. छिद्रांमधील घाण स्वच्छ न झाल्यास मुरुम, त्वचेचे विकार होण्याची शक्यता आहे. वेळीच याकडे लक्ष न दिल्यास त्वचा विकार गंभीर होऊ शकतात.**

# पावसाळ्यात सांभाळा शोभेच्या वस्तू

**घरात वेगळ्या शोभेच्या वस्तू ठेवण्यासाठी आपण अँटिक वस्तू घेतो. मात्र, त्यांची काळजी घेणं महत्त्वाचं असतं. पावसाळ्यात त्यांची काळजी घेण्यासाठी काही टिप्स...**



सहा महिन्यांतून एकदा पेंटिंगचा कॅनव्हास आणि फ्रेम तपासून पाहावी. फ्रेम बदलता येत असेल तर आवर्जून बदला. सुक्या आणि मऊसर कपड्यानं चित्राची फ्रेम रोज स्वच्छ करा. अँटिक वस्तू फक्त मऊसर कोरड्या कपड्यानंच साफ करा. अथवा मऊ धाग्यांचा टूथ ब्रश वापरा. सूर्याची किरणं जिथं पडतील, आग किंवा हिटरच्या ठिकाणी चित्रं आणि इतर अँटिक वस्तू ठेऊ नका. एखादी वस्तू ती पॅक करून ठेवताना विशेष काळजी घ्या. कापूस, बँडेज किंवा एखादा मऊसर कपड्यात ती आधी बांधून घ्या. मग त्यावर पेपर लावा. त्या आकाराचा बॉक्स मिळाला तर त्यात ठेवा. अन्यथा, प्लास्टिक किंवा कॉटनच्या पिशवीची व्यवस्था करा. यामुळे तिची चकाकी टिकून राहते. बांधून ठेवली, तरी सहा महिन्यांतून एकदा त्या वस्तूची तपासणी करा.

## शॉर्ट न्यूज

### सडे ग्रामपंचायत हद्दीत नारळ झाडांची लागवड

■ **राहुरी :** तालूक्यातील सडे ग्रामपंचायत हद्दीत एक हजार नारळाच्या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले. ग्रामपंचायतीस या झाडांच्या माध्यमातून उत्पन्नांचा स्रोत निर्माण होणार आहे. तसेच सर्वात महत्वाचे म्हणजे या नारळाच्या झाडांमुळे गावाच्या सौंदर्यात मोठी वाढ होणार आहे. काही दिवसांनी आपलं गाव पाहून प्रत्येक गावक-यास अभिमान वाटला पाहिजे, असं गाव दिसेल, अशी शाश्वती देण्यात आली. वृक्ष लागवड कार्यक्रमास गावातील व परिसरातील असंख्य नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### कृषी विभागाचे खरीप नियोजन शून्य

■ **श्रीरामपूर :** तालुका कृषी विभागाकडून खरीप पूर्व नियोजनसाठी बैठक घेतली गेली नाही. कोणत्याही उपाययोजना न केल्याने कृषी विभाग झोपेत असल्याचा आरोप तालुका काँग्रेसचे उपाध्यक्ष सुरेश पवार यांनी केला आहे. सध्या खरिपाच्या पेरण्या तोंडावर आलेल्या आहेत. पेरणीसारखा पाऊस झाल्याने शेतकरी पेरणीला सुरुवात करतील. अद्यापही कृषी विभागाकडून खरीप हंगामापूर्वीचे नियोजन शून्य असल्याचे दिसून येते. यासंदर्भात एकही आढावा बैठक कृषी अधिकाऱ्यांनी घेतलेली नाही.

### हल्ला करणाऱ्याच्या आवळल्या मुसक्या

■ **जामखेड :** शहरात दुध घालुन घरी जात असताना आरोळे वस्ती येथील एका किराणा दुकानासमोर आडवुन युवकावर अचानक हल्ला करत कोयत्याने सपासप वार करून गंभीर जखमी केले आहे. या प्रकरणी जीवे मारण्याचा प्रयत्न केल्या प्रकरणी चार जणांनविरोधात जामखेड पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे तर दोन जणांना पोलिसांनी अटक केली आहे. हल्ल्याचे कारण मात्र अद्याप समजु शकले नाही.

### गुणवंतांचा आमदार काळे यांच्या हस्ते गौरव

■ **कोपरगाव :** तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व आमदार काळे यांच्या वतीने कोपरगाव विधानसभा मतदार संघातील ईयत्ता १० वी १२ वीच्या परीक्षेत नेत्रदीपक यश मिळविलेल्या गुणवंतांचा व त्यांच्या पालकांचा काळे यांच्या हस्ते गौरव करण्यात आला याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी मराठी सिनेसृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते प्रसाद ओक उपस्थित होते. याप्रसंगी कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व संलग्न संस्थांचे चेअरमन, व्हा. चेअरमन, संचालक मंडळ, पदाधिकारी, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे मा. जी. प. प. स. सदस्य आदी उपस्थित होते.

### माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा उत्साहात

■ **श्रीगोंदा :** तालुक्यातील (पारगाव सुद्रिक) येथील छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेच्या डॉ. राजेंद्र प्रसाद विद्यालयात १९९४-९५ च्या दहावीच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा अतिशय उत्साहाच्या वातावरणात पार पडला. तब्बल २९ वर्षानंतर भेटलेले बाल सवंगडी आठवणींना उजाळा देत भावूक झाले होते. कार्यक्रमासाठी अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक देशमुख सर होते. यावेळी माजी विद्यार्थ्यांच्या वतीने इयत्ता पहिली ते दहावीच्या सर्व शिक्षकांना बोलवून त्यांचे गुरु- पूजन करत सर्व शिक्षकांना ट्रॉफी नारळ शाल देऊन सन्मानित करण्यात आले.

# बाजरी, सोयाबीन पेरणीसह तूर अन् कपाशी लागवडीला वेग

### जिल्ह्यात यंदा मृग नक्षत्रातच समाधानकारक पाऊस



**नगर : प्रतिनिधी**

**कायम दुष्काळी असलेल्या दक्षिण नगर जिल्ह्यात मृग नक्षत्रातील पावसाने जोरदार हजेरी लावली. बुधवारी सकाळी व रात्री देखील पावसाची संततधार सुरू होती. गेल्या वर्षी नगर जिल्ह्यात जून अखेरपर्यंत ५६ मिमी पावसाची नोंद झाली होती यंदा जूनच्या दुसऱ्या आठवड्यातच १०५ मिमी पाऊस झाला असून गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा दुप्पटीने पाऊस झाला आहे.**

गेल्या वर्षी जून महिन्यात जिल्ह्यात किरकोळ स्वरूपाचा पाऊस झाला होता. त्यामुळे खरिपाच्या पेरण्या देखील लांबणीवर पडल्या होत्या. जून, जुलै महिना कोरडा गेल्यानंतर ऑगस्ट महिन्यात काही प्रमाणात पाऊस झाला होता. मात्र तोही सर्वदूर सारखा नव्हता.

यंदा मात्र १ जून पासूनच मान्सूनपूर्व पावसाला सुरुवात झाली आहे. गेल्या वर्षी १ ते ३० जून या कालावधीत ५६ मिलिमीटर पाऊस झाला होता. यंदा ११ जून अखेरपर्यंत १०५ मिलिमीटर पावसाची नोंद झाली आहे. प्रामुख्याने दक्षिण जिल्ह्यातील नगर, पारनेर, श्रीगोंदे, कर्जत, जामखेड, शेवगाव पाथर्डी या भागात मृग नक्षत्रातील पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्या तुलनेत संगमनेर, अकोले, कोपरगाव, श्रीरामपूर व राहता या तालुक्यात मात्र कमी प्रमाणात पावसाची नोंद आहे. मंगळवारी शहर व परिसरात सकाळपासूनच पावसाला सुरुवात झाली होती. रात्री ७ नंतर पुन्हा पावसाची संततधार सुरू झाली आहे. आतापर्यंत नगर ११३, श्रीगोंदे १९२, कर्जत १७३, जामखेड १३०, शेवगाव ८८, पाथर्डी १४९, नेवासे ८५, राहुरी ७८, संगमनेर ५३, अकोले ५५, कोपरगाव ६६, श्रीरामपूर ८२ व राहाता ८७ मिलिमीटर पाऊस झाला आहे. दरम्यान, जिल्ह्यात बहुतांश ठिकाणी पावसाने बऱ्यापैकी हजेरी लावल्याने बाजरी, सोयाबीन पेरणी व तूर, कपाशी लागवडीस सुरुवात झाली आहे.

(पान १ वरुन)

### सुनेत्रा पवार यांचा राज्यसभेसाठी अर्ज

सर्व सदस्य आणि आमच्या पक्षाचे कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल, खासदार सुनील तटकरे आणि इतर मंत्री यांची बैठक झाली. या बैठकीत विचाराअंती सुनेत्रा पवार यांना राज्यसभेसाठी उभं करायचं आहे हा सर्वानुमते निर्णय झाला आहे. पक्षात सर्वांना एकत्र घेऊन चर्चा करायच्या असतात.''

**भाजपाच्या कोट्यातून राज्यसभेत जाणार?**

दरम्यान, भाजपाच्या कोट्यातून सुनेत्रा पवारांना राज्यसभेवर पाठवले जाण्याची शक्यता आहे. ''अजित पवारांकडे सुनेत्रा पवारांना राज्यसभेत पाठवण्यासाठी संख्याबळ कमी आहे. त्यामुळे आता भाजपाच्या मदतीने ते राज्यसभेत जाणार'', असंसंजय राऊतआज सकाळीच म्हणाले. महाराष्ट्रातून भाजपाच्या दोन जागा रिक्त होत आहेत. त्यामुळे पीयूष गोयल यांच्या जागेवरून राष्ट्रवादीला संधी दिली जाण्याची शक्यता आहे.

### बारामतीत दबावाचे वातावरण होते!

बदलण्यासाठी सरकार आपल्या हातात हवे. त्यामुळे आम्ही ठरवले चार महिन्याने विधानसभा निवडणुक असून सरकार आपण ताब्यात घ्यायचे निश्चित केले. मग, दूधाचा भाव, शेतपीकला हमीभाव, कांदा निर्यात प्रोत्साहन हे विषय मार्गी लावले जातील, असेही शरद पवार यांनी म्हटले आहे.

### सुपर ८ मध्ये भारत ऑस्ट्रेलिया आमने सामने

सामने कधी आणि कुठे खेळवले जाणार हे निश्चित झाले आहे. आयसीसीच्या निर्णयानंतर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात सामना होणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. दोन्ही संघांमधील हा सामना २४ जून रोजी सेंट लुसियाच्या मैदानावर होणार आहे. सुपर८ मधील भारतीय संघाचा हा तिसरा आणि शेवटचा सामना असेल, त्याआधी त्यांना आणखी २ सामने खेळावे लागतील ज्यासाठी प्रतिस्पर्धी संघांचा निर्णय होणे बाकी आहे. टीम इंडिया सुपर८ टप्प्यातील पहिला सामना २० जून रोजी बार्बाडोस येथे खेळणार आहे, तर त्यानंतर २२ जून रोजी अँटिगा येथे पुढील सामना खेळणार आहे.

**भारताचं सुपर८ मधील सामन्यांच वेळापत्रक**

२० जून बार्बाडोस (प्रतिस्पर्धी निश्चित नाही)
२२ जून अँटिगा (प्रतिस्पर्धी निश्चित नाही)
२४ जून भारत वि ऑस्ट्रेलिया, सेंट लुसिया

टी-२० विश्वचषक स्पर्धेत ऑस्ट्रेलियाविरुद्ध भारतीय संघाचा विक्रम आतापर्यंत चांगला राहिला आहे. ज्यामध्ये या स्पर्धेच्या इतिहासात त्यांनी कांगारू संघाविरुद्ध आतापर्यंत एकूण ५ सामने खेळले आहेत, ज्यामध्ये टीम इंडियाने ३ सामने जिंकले आहेत तर ऑस्ट्रेलियन संघाने २ सामने जिंकले आहेत. २०१० मध्ये झालेल्या टी-२० विश्वचषक स्पर्धेत, जेव्हा भारत आणि ऑस्ट्रेलिया वेस्ट इंडिजच्या ब्रिजटाऊन स्टेडियमवर आमनेसामने होते, तेव्हा कांगारू संघाने ४९ धावांनी सामना जिंकला होता.

# रोहित पवारांना जयंत पाटलांचा ठेंगा!

### युवक प्रदेशाध्यक्ष पदावर मेहबूब शेख कायम

**पुणे : प्रतिनिधी**

**राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या युवक प्रदेशाध्यक्षपदी दिवंगत नेते आर. आर. पाटील यांचे चिरंजीव रोहित पाटील यांची नियुक्ती करण्यासाठी आग्रही आमदार रोहित पवार यांचे वर्षभर सुरू असलेले प्रयत्न व्यर्थ ठरले आहेत. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे विश्वासू असलेले विद्यमान 'युवक' प्रदेशाध्यक्ष मेहबूब शेख हेच या पदावर कायम राहिले आहेत. त्यामुळे रोहित पवार आणि जयंत पाटील यांच्यातील सुप्त संघर्षाची ठिणगी पडल्याची चर्चा नव्या 'राष्ट्रवादी'त आहे.**



राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर निर्माण झालेल्या राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या वर्धानपदिनानिमित्त नगर येथे आयोजित कार्यक्रमात व्यासपाठीवर जयंत पाटील आणि रोहित पवार यांनी एकमेकांना कोपरखळ्या मारल्या होत्या. त्यानंतर या नेत्यांमधील सुप्त संघर्ष जाहीरपणे चव्हाट्यावर आला असून, त्यांचे समर्थकही एकमेकांवर टीकेची झोड उठवित आरोपांच्या फैरी झाडत आहेत. रोहित पवार समर्थकांकडून प्रदेशाध्यक्ष बदलण्याची मागणी होत आहे; तर प्रदेशाध्यक्षपद सांभाळणे कोंबड्या पकडण्याइतके सोपे नसल्याचा टोला जयंत पाटील समर्थकांकडून लगावण्यात येत आहे.

राष्ट्रवादी काँग्रेसमधील फुटीनंतर बहुतांश आमदारांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत जाण्याचा निर्णय घेतला. परंतु, संघटनेतील बहुतांश पदाधिकारी ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासमवेतच राहिले. त्यामुळे विधिमंडळातील पक्षामध्ये फूट पडल्यानंतरही संघटनेला फारसे तडे गेले नाहीत. जयंत पाटील यांच्या समर्थकांची संघटनेतील लक्षणीय संख्या हे त्यामागचे कारण आहे. बहुतांश शहराध्यक्ष, जिल्हाध्यक्ष व पदाधिकारी हे पाटील यांनीच नियुक्त केले असल्याने ते त्यांच्यासमवेत असल्याचे चित्र आहे. त्यापैकी मेहबूब शेख हे युवक प्रदेशाध्यक्ष आहेत.

दरम्यान, 'राष्ट्रवादी'तील फुटीनंतर आमदार पवार यांनी युवकांच्या प्रश्नांकडे सरकारचे लक्ष वेधण्यासाठी राज्यभर संघर्ष यात्रा काढली होती. 'राष्ट्रवादी' युवकच्या मुख्य पदाधिकाऱ्यांनी या यात्रेकडे पाठ फिरवली होती. त्याच वेळी 'राष्ट्रवादी'तील धुसफूस चव्हाट्यावर आली होती. रोहित पवार यांच्या नेतृत्वाला जयंत पाटील यांच्या समर्थक नेत्यांकडून वाकुल्या दाखविण्यात आल्याचे प्रकार घडत होते; मात्र, रोहित पाटील या यात्रेत रोहित पवारांसोबत सक्रिय सहभागी होते. त्यामुळे या यात्रेनंतर रोहित पाटील यांना 'युवक'चे प्रदेशाध्यक्ष म्हणून नियुक्त केले जाईल, अशी अटकळ बांधण्यात येत होती. मात्र, निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जुन्या संघटनेत कुठलेही बदल करण्यात आलेले नाहीत. तेव्हापासून पवार आणि पाटील समर्थकांमध्ये सातत्याने सुप्त संघर्ष दिसत आहे. 'राष्ट्रवादी'च्या अधिवेशनात या संघर्षाला तोंड फुटले असून, त्यावर दोन्हीही नेत्यांनी साधलेले टायमिंग हा राज्यभर चर्चेचा विषय आहे. आगामी विधानसभा निवडणुकांपूर्वीच संघटना कोणाची, यावरून सुरू असलेला हा सुप्त संघर्ष शरद पवारांसाठी डोकेदुखी ठरल्याचे चित्र सध्या दिसते आहे.









# पावसाने उघडीप दिल्याने खरिपाच्या पेरणीला वेग

■ गेल्या वर्षीच्या तुलनेत वाटाण्याचे बियाणे दुपटीने महागले ■ वाटाण्यापेक्षा बियाण्याचे दर चौपट

**पारनेर : प्रतिनिधी**

**पारनेर तालुक्यातील सुपे महसूल मंडळातील काही गावे वगळता इतरत्र पावसाने दोन दिवस उघडीप दिल्याने खरीप हंगामातील विविध पिकांच्या पेरण्यांना वेग आला आहे.गेल्या तीन,चार वर्षांत यावर्षी प्रथमच जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात पेरणीयोग्य पाऊस झाल्याने शेतकऱ्यांमध्ये उत्साह आहे. मात्र विविध बियाणे, खतांच्या किंमतीत,मोठ्या प्रमाणावर वाढ झाल्याने पेरणीच्या खर्चाची जुळवाजुळव करण्यासाठी शेतकऱ्यांची तारांबळ उडाली आहे.**

गेल्या वर्षी साडेतीन ते चार हजार रुपयांना मिळणारी वाटाणा बियाण्याची ४० किलो गोणीची किंमत यावर्षी साडेसात हजार रुपये झाली आहे. हिरव्या वाटाण्याला मिळणाऱ्या दरापेक्षा बियाण्याचा दर जवळपास चौपट आहे.साडेचार ते पाच हजार रुपये प्रतिक्विंटल विकल्या जाणाऱ्या सोयाबीनच्या बियाण्याचे दर प्रतिक्विंटल साडेसात ते आठ हजार रुपये इतके आहेत.

बियाण्यावर केली जाणारी प्रक्रिया,मजुरी व कंपनी,व्यापाऱ्यांचा नफा या बाबी गृहीत धरल्या तरी बियाण्याचा दर जास्त असल्याचे वाटाणा उत्पादकांचे म्हणणे आहे.
दरम्यान बाजरी,मूग,मका,उडीद या खरीप हंगामात घेतल्या जाणाऱ्या पिकांच्या बियाण्यांच्या किंमतीत गेल्यावर्षीच्या तुलनेत सर्वसाधारणपणे २० टक्के वाढ झाली असल्याचे बियाणे व खते विक्रेते अशोक डमरे यांनी सांगितले.वाटाण्याचे बियाणे मध्यप्रदेश व उत्तरप्रदेशातून येते.तेथे वाटाण्याच्या हंगामात गारपीट झाल्याने वाटाण्याचे उत्पादन कमी झाले. तसेच जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात तेथील स्थानिक बाजारपेठेत हिरव्या वाटण्याच्या शेंगाना उच्चांकी भाव मिळाला.त्यामुळे बियाण्यासाठी पीक राखून ठेवण्याऐवजी हिरव्या शेंगा विकणे शेतकऱ्यांनी पसंद केले.परिणामी बियाण्याचे उत्पादन कमी झाल्यामुळे वाटाण्याच्या बियाण्यांच्या दरात गेल्यावर्षीच्या तुलनेत दुप्पट वाढ झाल्याचे डमरे यांनी सांगितले.



■ पारनेर येथील ठोंबरे मळ्यातील,औटी वस्तीवर पारंपरिक पद्धतीने पेरणी करताना शेतकरी (छाया -संजय औटी)

### चालू खरीप हंगामातील पीकनिहाय प्रस्तावित क्षेत्र

अनुक्रमे पीक,गेल्यावर्षी पेरणी झालेले क्षेत्र (हेक्टर), चालू हंगामातील प्रस्तावित पेरणी क्षेत्र (हेक्टर)
१)बाजरी- १७ हजार ७०९ -१८हजार ५९४,
२)मूग-१६ हजार ०९९-१८ हजार ०२२
३)सोयाबिन-१२ हजार ५०७ -१३ हजार १३२
४) वाटाणा-६ हजार ५१६-६ हजार ८४२
५)मका- २ हजार १८४-२ हजार २९३
६)तूर-२ हजार १७०-२ हजार २७८
७)कांदा-९३०-१ हजार ५३१
८)ऊस ५१६-५४२
९)उडीद -२५८-२७०
१०) भुईमुग -३३-३५
एकूण - ५८ हजार ०८२-६३ हजार ५३९

### दर नियंत्रीत ठेवण्यासाठी उपाययोजना हवी

बियाणे उत्पादक कंपन्यांवर सरकारचे नियंत्रण नाही.त्यामुळे कंपन्या व विक्रेत्यांकडून शेतकऱ्यांची लूटमार होते.दुसरीकडे शेतीमालाला हमीभाव न देता, ग्राहकांना झळ बसू नये म्हणून सरकार शेतीमालाचे भाव नियंत्रित राहण्यासाठी विविध उपाययोजना करते.ही बाब शेतकऱ्यांना कर्जाच्या खाईत लोटणारी आहे.बियाण्यांचे दर नियंत्रणात आणण्यासाठी सरकारने उपाययोजना करणे आवश्यक आहे.

महेंद्र पांढरकर,
प्रगतीशील शेतकरी,निघोज.

### सोयाबीन बियाण्यासाठी अनुदान

कृषी विभागाकडून सोयाबीन बियाण्यासाठी प्रतिकिलो २५ रुपये अनुदान देण्यात येत आहे.त्यामुळे सोयाबीन बियाणे ८५ रुपयांऐवजी ६५ रुपये प्रतिकिलो दराने खरेदी करता येईल.शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालयातून परवाना (परमीट) घेऊन महाबिजच्या अधिकृत विक्रेत्यांकडून अनुदानित सोयाबीन बियाणे खरेदी करावे असे आवाहन तालुका कृषी अधिकारी मारूती घुले यांनी केले आहे.

# नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर

प्राचार्य पी.एम.दिघे यांचे प्रतिपादन




**निघोज : प्रतिनिधी**

**नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांना फायदेशीर असून आजच्या हायटेक विद्यार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन प्रवरानगर महाविद्यालयाचे प्राचार्य पी.एम. दिघे यांनी केले.**

श्री.मुलिकादेवी महाविद्यालय निघोज येथे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० याविषयी एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, या कार्यशाळेसाठी पी. व्ही. पी. कॉलेज लोणी प्रवरानगरचे प्राचार्य डॉ. पी.एम.दिघे तसेच डॉ. एम.एन.खर्डे हे प्रमुख, मराठी विषयाचे अभ्यास मंडळ सदस्य डॉ. शांताराम चौधरी तसेच डॉ. अशोक वाबळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे विश्वस्त सिताराम खिलारी होते.या कार्यशाळेत प्रसंगी पहिल्या सत्रात प्रास्ताविक महाविद्यालयाची प्राचार्य डॉ. सहदेव आहेर यांनी केले तर पाहुणे परिचय उपप्राचार्य डॉ. मनोहर एरंडे यांनी केले.

प्राचार्य दिघे यांनी नवीन शैक्षणिक धोरण भविष्यासाठी किती महत्त्वाचे आहे हे यावेळी सांगितले. विद्यार्थ्यांच्या अंगभूत कौशल्यांचा विकास करून त्यांना व्यावसायिक संधीसाठी तयार करणे हा या नवीन शैक्षणिक धोरणाचा उद्देश आहे त्यामुळे हे नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थ्यांसाठी फायदेशीर असेल असे सांगितले तर डॉ. खर्डे यांनी शैक्षणिक धोरण याची संरचना स्पष्ट केली तर सिताराम खिलारी यांनी नवीन शैक्षणिक धोरणाचा फायदा विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी यांना नक्कीच होईल तसेच सर्वांनी नवीन शैक्षणिक धोरण समजून घेणे गरजेचे आहे असे सांगितले.
या कार्यशाळेच्या दुसऱ्या सत्रात न्यू आर्ट्स कॉमर्स अँड सायन्स कॉलेज अहमदनगर येथील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष समन्वयक डॉ. ए. डी. हरकल उपस्थित होते. डॉ. हरकल यांनी नवीन शैक्षणिक धोरणाची रचना तसेच राबविण्याची पद्धती नेमकेपणाने स्पष्ट केली.

कार्यक्रमाप्रसंगी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय अळकुटी येथील प्राचार्य डॉ. शरद पारखे उपप्राचार्य प्रा. अर्जुन चाटे तसेच अळकुटी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि परिसरातील इतर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक या कार्यशाळेसाठी उपस्थित होते. या कार्यशाळेचे सूत्रसंचालन प्रा. आनंद पाटेकर व प्रा. नूतन गायकवाड यांनी केले तर आभार प्रा. मनीषा गाडीलकर यांनी मांडले या कार्यशाळेचे समन्वयक प्रा. अक्षय अडसूळ यांनी कार्यशाळेचे नियोजन केले होते.

# नारायणगव्हाण रस्ता चौपदरीकरण प्रक्रिया रेंगाळली

शरद पवळे, सचिन शेळकेंनी वेधले प्रांताधिकाऱ्यांचे लक्ष




**नारायणगव्हाण, सुपा : प्रतिनिधी**

**मृत्यूचा सापळा बनलेल्या नगर-पुणे महामार्गावरील नारायणगव्हाण येथील रस्त्याचे चौपरीकरण करण्यासाठी आंदोलने करण्यात आल्यानंतर हाती घेण्यात आलेली चौपदरीकरणाची प्रक्रिया रेंगाळली असून प्रशसनाने त्यात लक्ष घालण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते शरद पवळे व सचिन शेळके यांनी प्रांताधिकारी गणेश राठोड यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.**

या रस्त्याचे चौपदरीकरण करण्यासाठी भुमी अभिलेख कार्यालयाकडे तातडीने मोजणी शुल्क जमा करण्यात आले आहे. मात्र त्यानंतर भुमी अभिलेख कार्यालयाकडून कोणत्याही हालचाली करण्यात येत असल्याचे दिसून येत नाही. वास्तविक या रस्त्यावर वारंवार होणा-या अपघातांमुळे हा माहामार्ग मृत्यूचा सापळा बनला आहे. त्यासाठी प्रशासकीय पातळीवर पाठपुरावा करून प्रशासनास होणा-या जीवीत यांची भेट घेऊन व्यक्त केल्या. या एकेरी रस्त्यामुळे नारायणगव्हाणच्या नागरीकांपुढे कायम संकट उभे असते. या स्थितीचा गांभीर्याने विचार करून स्वत: लक्ष घालून आपण हे चौपदरीकरण लवकरात लवकर पुर्ण करण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

जाणीची वेळोवेळी जाणीव करून देउनही होत असलेल्या दुर्लक्षाबाबत आंदोलकांनी खेद व्यक्त केला आहे.

प्रशासकीय अधिकारी जबाबदारीने काम करताना दिसत नसून प्रशसनाचा हा जीवघेणा हालगजीपणा घात असल्याच्या भावना पवळे व शेळके यांनी उपविभागिय अधिकारी गणेश राठोड

### संबंधितांना स्मरणपत्र देणार

नारायणगव्हाण येथील रस्त्याच्या चौपदरीकरणाबाबत संबंधित विभागांशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. तरीही या कामात दिरंगाई होत असेल तर आपण सबंधित विभागांना पुन्हा स्मरण पत्र देऊन हे काम मार्गी लावण्यासाठी पुढाकार घेऊ.

गणेश राठोड, प्रांताधिकारी
पारनेर-श्रीगोंदा भाग

# वृक्षारोपण व संवर्धन काळाची गरज

■ माजी सरपंच बाबासाहेब शिंदे यांचे मत
■ वडगाव सावताळ येथे वृक्षारोपणाला प्रोत्साहन



**वडगाव सावताळ : प्रतिनिधी**

**सध्या उष्णतेचे वाढते प्रमाण व पर्यावरणाचा होत असलेला ऱ्हास लक्षात घेऊन वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन करणे ही काळाची गरज आहे असे मत वडगाव सावताळचे माजी सरपंच बाबासाहेब शिंदे यांनी व्यक्त केले.**

श्री. शिंदे म्हणाले की,वृक्षारोपण केल्याने पर्यावरणाचा ऱ्हास थांबतो वृक्षतोड न करता वृक्षारोपण केले पाहिजे हा सामाजिक संदेश आपण प्रत्येकाने अंगीकारणे गरजेचे असल्याचे ही यावेळी शिंदे म्हणाले आहेत.

वडगाव सावताळ येथे दरवर्षी माजी सरपंच बाबासाहेब शिंदे हे वृक्षरोपण व वृक्ष संवर्धन चळवळ चालवत असून येथील शेतकऱ्यांना ते वृक्षारोपणासाठी प्रोत्साहन देत आहेत. वृक्षारोपण हा सामाजिक उपक्रम ते दरवर्षी राबवत असतात.

नांदुरखीचे झाडे (स्टंप) वाटप शेतकऱ्यांना करण्यात आले. यावेळी वडगाव सावताळचे माजी सरपंच बाबासाहेब शिंदे, भाजप नेते शिवाजी रोकडे, पोपट सरोदे, विश्वनाथ रोकडे, विजय रोकडे, मंजाबापू रोकडे, अन्सार शेख, सुदाम खोडदे, मंगेश सांगडे, लहू शिंदे आदी मान्यवर व ग्रामस्थ यावेळी उपस्थित होते.

# एमआयडीसीतील पार्किंग हटवा

मनसे नेते रविश रासकर यांचा आंदोलाचा इशारा

**सुपा : प्रतिनिधी**

**सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीमधील पी जी व जाफा कंपन्यांमध्ये माल घेउन येणाऱ्या व जाणाऱ्या वाहनांचे रस्त्यावर पार्किंग करण्यात येत असून त्यामुळे इतर वाहन चालकांना त्याचा त्रास होतो. नियमितपणे करण्यात येत असलेली ही पार्कींग बंद न केल्यास येत्या १५ जुलै रोजी सुपा पोलीस ठाण्यासमोर बेमुदत उपोषण करण्याचा इशारा मनसे नेते रविश रासकर यांनी दिला आहे.**

या पार्किंगबाबत कामगार तसेच वाहनचालकांनी रासकर यांच्याकडे तक्रार केल्यानंतर रासकर यांनी पोलीस प्रशासन व औद्योगिक वसाहतीच्या अधिकाऱ्यांना निवेदन देऊन लक्ष वेधले होते. निवेदनानंतर वसाहतीमधील रस्त्याचे काम पुर्ण करण्यात आले. पार्किंग मात्र हटविण्यात आली नाही. वास्तविक या वाहनांसाठी इतरत्र जागा उपलब्ध करून देणे अपेक्षीत होते. त्याकडे मात्र दुर्लक्ष करण्यात आले. ही वाहने रांगेने रस्त्यावर उभी असल्याने कामगार, इतर वाहन चालक तसेच प्रवाशांना त्याचा नाहक त्रास सहन करावा लागतो. औद्योगिक वसाहत म्हटल्यावर तिथे वाहने येणारच.




■ सुपा-पारनेर औद्योगिक वसाहतीमध्ये रस्त्यावर मोठया प्रमाणावर वाहने पार्किंग करण्यात येत असल्याने इतर वाहनचालकांना त्याचा त्रास होतो.

मात्र अशा वाहनांच्या पार्किंगची व्यवस्था करणे हे औद्योगिक विकास महामंडळाचे कर्तव्य आहे.

औद्योगिक विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांनी येत्या २५ दिवसांत वाहनांच्या पार्कीगसाठी व्यवस्था करावी. अन्यथा १५ जुलै पासून बेमुदत उपोषण करण्याचा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. निवेदनाच्या प्रती पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी, सार्वजनीब बांधकाम विभागाचे उपअभियंता, औद्योगिक विकास महामंडळाचा स्थापत्य विभाग, तहसिलदार पारनेर, जिल्हा शल्य चिकित्सक यांना देण्यात आल्या आहेत.

# मायबाप सरकारने दूधाला हमीभाव द्यावा

शिवबा संघटना, युवा सेनेची मागणी

**पारनेर : प्रतिनिधी**

**महाराष्ट्रासह पारनेर, शिरूर तालुक्यात दुधाच्या व्यवसाय मोठया प्रमाणात असून शेतीला जोडधंदा म्हणून बहुतांश शेतकरी दुग्ध व्यवसायाकडे वळाले आहेत. मात्र दुधाला भाव नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला असून मायबाप सरकारने दुधाला हमीभाव देऊन शेतकऱ्यांपुढील संकट दूर करण्याची मागणी शिवबा संघटना तसे युवा सेनेच्या वतीने करण्यात आली.**

दुधाच्या घसरलेल्या दराबाबत शिवबा संघटना व युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांची नुकतीच बैठक पार पडली. शिवबा संघटनेचे अध्यक्ष तसेच युवा सेनेचे तालुकाप्रमुख अनिल शेटे, बबन तनपुरे, सोमनाथ भाकरे, राजू भाउ लाळगे, शंकर पाटील वरखडे, केशव शिंदे, यश रहाणे, योगेश भाकरे, नवशाद पठाण, डॉ. ओंकार जाधव, रोहिदास लामखडे, ऋषीकेश शेटे, समाधान



दुडे, ॲड. दत्तात्रेय सोदक, दत्ता टोणगे, गणेश चौधरी, नागेश नरसाळे, नीलेश दरेकर, माऊली पानगे, जयराम सरडे, अक्षय बेलोटे, अविनाश भाकरे, विकास मोरे, शांताराम पाडळे, राहुल मोरे, अंकुश वरखडे, नीलेश वरखडे, नीलेश कदम, संतोष साबळे, गुलाब पानगे, आदी यावेळी उपस्थित होते.

सध्या शेतमालास भाव नसल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत आहेत. जोडधंदा असलेल्या दुधाच्या धंद्यावर शेतकरी वर्गाचा उदरनिर्वाह सुरू असताना भाव नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती अधिकच बिकट झाली आहे. शेतीचा तसेच दुधाचा उत्पादन खर्च वाढत असताना त्यावर कोणाचेही निर्बंध नाहीत. दुध दरावर मात्र निर्बंध लादण्यात आल्याने हा शेतकरी वर्गावर अन्याय असल्याचे बबन तनपुरे व सोमनाथ भाकरे यांनी सांगितले. बैठकीत निश्चित करण्यात आल्यानुसार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दुग्धविकास मंत्री राधाकृष्ण विखे, खासदार नीलेश लंके यांना ईमेलद्वारे निवेदन पाठविण्यात आले.

निवेदनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या व्यथा मांडण्याचा प्रयत्न करण्यात आला असून दुधास भाव नसल्याने शेतकरी बांधवांमध्ये प्रचंड असंतोष असल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले आहे. दुध दरामध्ये वेळीच वाढ झाली नाही तर शेतक-यांना सोबत घेउन शिवबा संघटना तसेच युवा सेना रस्त्यावर उतरून पारनेर व शिरूर तालुक्यात आंदोलन हाती घेईल असा इशारा देण्यात आला आहे. आंदोलनाच्या ठिणगीचे रूपांतर महाराष्ट्रभर वणव्यात होईल असेही या निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

# पोटच्या मुलाचे अवयव दान करीत नाईक परिवाराचा आदर्श

■ वीस वर्षाचा महेश अपघातात झाला होता गंभीर जखमी ■ ब्रेन डेड झाल्याने अवयव दानाचा घेतला निर्णय

**सुपा : प्रतिनिधी**

**रूईछत्रपती येथील संजय व आशाबाई नाईक यांच्या वीस वर्षाच्या महेश या मुलाचा अपघात होऊन त्यात तो गंभीर जखमी झाला. त्याचा ब्रेन डेड झाल्याने तो वाचण्याची शक्यता मावळल्याने महेशचे अवयव दान करण्याचा निर्णय घेत नाईक कुटूंबाने समाजापुढे आदर्श घालून दिला आहे.**



संजय नाईक यांचा मुलगा महेश हा नगर ते वाळकी दरम्यानच्या प्रवासात गंभीर जखमी झला होता. अपघातानंतर त्याच्यावर नगर येथील खाजगी रूग्णालयात उपचार करण्यात आले. मात्र महेश यास झालेली दुखापत गंभीर स्वरूपाची असल्याने डॉक्टरांच्या सल्ल्याने त्यास पुणे येथील रूबी हॉल येथे पुढील उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र महेश याच्या मेंदूला गंभीर स्वरूपाची इजा झाल्याने तो वाचणार नाही असे रूबी हॉलच्या डॉक्टरांनी सांगितले.

### सामाजिक बांधिलकीची जाणीव

महेश याचा ब्रेन डेड झाल्याने त्यातून तो सावरू शकणार नाही. त्याची जगण्याची शक्यता मावळल्याने डॉक्टरांनी सांगितल्यानंतर संजय व आशा नाईक यांना धक्का बसला. एकुलता एक मुलगा अवघ्या वीसाव्या वर्षी हे जग सोडून जाणार असल्याच्या कल्पनेने ते हादरून गेले. डॉक्टरांनी महेश याचे अवयव दान करण्याचा प्रस्ताव ठेवल्यानंतर संजय व आशा यांनी या धक्क्यातून सावरत सामाजिक बांधिलकीची जाण ठेवत महेश याच्या दोन्ही किडण्या, हृदय तसेच फुफ्फुसाचे दान करण्यास त्यांनी सहमती दर्शविली. महेश याचे वडील संजय हे मुंबईत शिक्षक म्हणून काम पाहतात. सामाजिक कार्यात आघाडीवर असेलल्या संजय नाईक यांनी माझा मुलगा जग सोडून जात असताना त्याच्या अवयांमुळे कुणाला जीवदान मिळत असेल तर ते दान करण्यास हरकत नसल्याची भूमिका त्यांनी मांडली.

### म्हणून अवयव दान करण्याचा निर्णय

आमचा एकुलता एक मुलगा आम्हाला सोडून गेला हे दुःख आयुष्यभर विसरता येणार नाही. त्याच्या अवयांमुळे चार जणांना जिवदान मिळाले याचे समाधान आहे. केवळ मेंदू सारखा अवयव निकामी झाल्याने आमचा मुलगा गेला, अशी वेळ कोणावरही येउ नये. आजून तरी मानवी अवयव तयार करण्यात विज्ञानास यश आलेले नाही. त्यामुळेच महेश याचे अवयव दान करण्याचा आपण निर्णय घेतला.

संजय नाईक, मुलाचे वडील, रूईछत्रपती, ता. पारनेर

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com